# ‘‘प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग उन्नयन योजने अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे ‘‘फळे आणि भाजीपाला प्रक्रीया उद्योग प्रशिक्षण’’ संपन्न....

दिनांक. १८ मे २०२२ ते २० मे २०२२ या कालावधीत कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे ‘‘फळे आणि भाजीपाला प्रक्रिया उद्योग’’ या विषयावरिल तिन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग उन्नयन योजने अंतर्गत क्षमता बांधणी घटकांतर्गत सदर प्रशिक्षणाचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र, धुळे असेच कृषि विभाग धुळे यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

उद्‌घाटन प्रसंगी कृषि महाविद्यालय, धुळे चे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. सी. डी. देवकर हे अध्यक्ष होते. ते म्हणाले कि धुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये असंघटीत स्वरुपातील सुक्ष्म तसेच गृह पातळीवरिल असंख्य अन्नप्रक्रिया उद्योग आहेत. त्यात प्रामुख्याने पापड उद्योग, शेवया कुरडई, केळी वेफर्स तसेच दूग्ध प्रक्रिया उद्योग, मसाले इ. चा समावेश होतो. अनेक महिला बचतगट अशा प्रकारच्या उद्योगांमध्ये सक्रिय असून त्यांना आर्थिक तसेच तांत्रिक पाठबळ देण्यासाठी सदर प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेचा (PMFME) प्रमुख उद्देश आहे.

तांत्रिक सत्रांमध्ये कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख(कार्यक्रम समन्वयक) डॉ. दिनेश रा. नांद्रे, विषय विशेषज्ञ श्रीमती. अम्रिता अशोक राऊत, श्री. रोहित वि. कडु, तसेच डॉ. धनराज म. चौधरी यांनी फळे आणि भाजीपाला प्रक्रिया तसेच उद्योजक्ता विषयी सखोल मार्गदर्शन केले.

तिन दिवसाच्या या प्रशिक्षणास ३० प्रशिक्षणार्थीना प्रवेश होता. सदर प्रशिक्षणार्थी हे धुळे जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामिण भागातून आले होते. प्रशिक्षणाची सांगता दिनांक. २०/०५/२०२२ रोजी करण्यात आली.

प्रशिक्षणाच्या यशस्वितेसाठी कृषि विज्ञान केंद्र, धुळेचे सर्व कर्मचारी तसेच कृषि विभागातील श्रीमती. पुष्पा हिंगे, जिल्हा संसाधन व्यक्ती श्री. संदिप गोर्डे यांचे विशेष सहकार्य लाभले तसेच सर्व शास्त्रज्ञ डॉ. पंकज प्र. पाटील, श्री. रोहित वि. कडू, व डॉ. धनराज म. चौधरी व कर्मचारी श्री. जयराम मो. गावित, श्री. बाळू य. वाघ, श्री. रमेश द. शिंदे, श्री. कुमार को. भोये व श्री. मधुसूधन के. अहिरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


कृषि विज्ञान केंद्र, धुळे
महात्मा फुले कृषि विद्यापीठ
कृषि विज्ञान केंद्र, धुळे
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे
यांच्या संयुक्त विद्यमाने
प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत
फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग
जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रम
दिनांक : : १८ ते २० मे २०२२